# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थप्रशासन विभाग

---

## परिपत्रक

जा.क्र. अप्रवि/सेवार्थ/ 1189 A /2014 दिनांक :– 06/09/2014

**विषय :– एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके निर्गमित करण्याबाबत.**

**संदर्भ** :– 1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012/प्र.क्र. 169/8–अे, दि. 23.11.2012

2. मा.सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण 10–11/प्र. 100/कोषा (प्र.–5), दिनांक 25 जूलै 2014

3. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012/प्र.क्र. 169/8–अे दि. 26 ऑगस्ट 2014

संदर्भ क्र. 2 च्या पत्रानुसार महाराष्ट्र शासनाने या विद्यापीठास असे कळविले आहे की, एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये कस्टमाईज्ड व्हर्जनमध्ये मंजूर पदांची माहीती भरतांना संबंधित अधिकारी/कर्मचारी कार्यरत असलेल्या पदांची संख्या आणि प्रत्यक्षात प्रणालीत भरलेल्या या संदर्भातील संख्या यामध्ये तफावत आढळून येते. तरी आपण आपल्या आस्थापनेवर असलेली मंजूर पदे आणि प्रत्यक्षात एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये तयार करण्यात आलेली पदे यामध्ये काही तफावत आहे का याबाबतची माहीती 15 सप्टेंबर 2014 पर्यंत न चुकता नियंत्रक कार्यालयास सादर करावी.

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन व लेखा अधिकारी, अकोला/नागपूर यांना कळविण्यात येते की, माहे **सप्टेंबर 2014 च्या ऑक्टोंबर 2014 मध्ये देय होणारे वेतन** एसएयु सेवार्थ प्रणालीमधून निर्गमित करावयाचे आहे.

कार्यालयातील उपलब्ध संगणक साधनसामुग्रीव्दारे किंवा खाजगी संगणक केंद्रामधून एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये माहे सप्टेंबर 2014 च्या ऑक्टोंबर 2014 मध्ये देय वेतन निर्गमित करून घेण्यात यावेत. तसेच येणा–या अडचणी आढळून आल्या तरी संबंधित वेतन देयक संगणक प्रणालीत

निर्गमित करावे. असे निर्गमित केलेले देयक संबंधित वेतन लेखाधिकारी (डीडीओ–2) यांच्याकडे दिनांक 20 सप्टेंबर 2014 पर्यंत Forward करण्यात यावे.

माहे सप्टेंबर 2014 च्या ऑक्टोंबर मध्ये देय वेतन पारंपारिक पध्दतीने करावयाची कार्यवाही पूर्ण करावी. **परंतु पारंपारिक पध्दतीने बनवण्यात आलेले वेतन देयक संबंधित वेनत व लेखाधिकारी अकोला/नागपूर यांच्याकडे सादर करू नये.** पारंपारिक पध्दतीचे देयक आणि एसएयु संगणक प्रणालीतून निर्गमित केलेले देयक या दोन्ही देयकामध्ये कुठे तफावत आढळते का हे तपासावे. जर तफावत येत असल्यास सदर तफावत कोणत्या कारणामुळे आलेली आहे यासंबंधीची विस्तृत माहीती नियंत्रक कार्यालयास 22 सप्टेंबर 2014 पर्यंत पोहोचविण्यात यावी.

याबाबत काटेकोर अंमलबजावणी करावी.

**नियंत्रक**
**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,**
**अकोला**

प्रतिलीपी :–
1. **मा. कुलगुरू,** डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे स्विय सहाय्यक यांना माहीतीसाठी सविनय सादर.
2. **मा. कुलसचिव**, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीतीसाठी
3. श्री. सुनिल व्यास, मा. सहसंचालक (सुधारणा) लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मंत्रालयासमोर, मुंबई.
4. श्रीमती मिनाक्षी सिंग, ॲक्सेचर कंपनीचा प्रतिनिधी यांना टीसीएस कंपनी योग्य माहीतीसाठी सविनय सादर
5. वित्त सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भोसले नगर, पुणे.
6. वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपूर यांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन देयक एसएयु सेवार्थ प्रणालीत विहीत कालावधीचे वेतन देयक तयार झाले किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. तसेच माहे सप्टेंबर 2014 च्या देय ऑक्टोंबर चे वेतन पारंपारिक पध्दतीने पारीत करू नये.
7. सर्व विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.